**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातला उमेदवारी मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस

- दुसऱ्या टप्प्यातला प्रचार शिगेला

- राष्ट्रपतींच्या हस्ते आज पद्म पुरस्कारांचं वितरण

- मालदीवमध्ये, संसदीय निवडणुकीत अध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांच्या पीएनसी पक्षाची बहुमताच्या दिशेने वाटचाल

**आणि**

- फिडे बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या गुकेशची ऐतिहासिक कामगिरी

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातला उमेदवारी मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. बहुतेक ठिकाणी प्रमुख लढतींचं चित्र स्पष्ट झालं आहे. उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपल्यावर रिंगणात किती प्रतिस्पर्धी आहेत ते निश्चित होईल. या टप्प्यात देशभरात १० राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या मिळून ९४ मतदारसंघांमधे येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे. त्यात गुजरातमधल्या सर्व २६, कर्नटकातल्या १४, उत्तरप्रदेशातल्या १० जागांचा

समावेश आहे. मध्यप्रदेशात ८, छत्तीसगढमधे ७ बिहारमधे ५, आसाम आणि पश्चिम बंगालमधे प्रत्येकी ४, गोव्यात २ ठिकाणी मतदान होणार आहे. दादरा -नगरहवेली, तसंच दीव – दमण या केंद्रशासित प्रदेशातल्या प्रत्येकी २ मतदारसंघात आणि जम्मू काश्मीरमधे एका मतदारसंघात या दिवशी मतदान होईल.

महाराष्ट्रात रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या ११ मतदारसंघांमध्ये तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. उमेदवारी अर्जांची छाननी झाल्यानंतर ३१७ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्पयातला प्रचार शिगेला पोहोचला आहे. भारतीय जनता पार्टीचे प्रमुख नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशातल्या अलीगढ मध्ये प्रचारसभेला संबोधित करणार आहेत. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथही संबोधित करणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपा अध्यक्ष जे.पी.नड्डा हे छत्तीसगड़मध्ये प्रचार करणार आहेत. अमित शाह यांनी आज कांकेर इथं प्रचारसभा घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या काळात कलम ३७० हटवण्याबरोबरच दहशतवाद आणि नक्षलवाद समाप्त केल्याचं यावेळी ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून २ दिवसांच्या छत्तीसगड दौऱ्यावर असून या वेळी जांजगीर, धमतरी आणि अंबिकापूरमध्ये प्रचारसभा घेणार आहेत.

**<><><><><>**

आकाशवाणीवरुन राजकीय पक्षांच्या निवडणूक विशेष प्रसारणाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३

वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, उद्या दुपारी राजकीय पक्षाचं प्रसारण संपल्यानंतर प्रसारीत केलं जाईल.

**<><><><><>**

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते यावेळी उपस्थित होते. त्यानंतर युवा सेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत खैरे यांची प्रचार रॅली काढण्यात येत आहे.

नंदुरबार लोकसभा मतदारसंघातून भाजप उमेदवार डॉ. हिना गावित तसंच काँग्रेसचे उमेदवार गोवाल पाडवी यांनी देखील आज उमेदवारी अर्ज भरतला. हिना गावित यांनी अर्ज भरण्यापूर्वी रॅली काढून शक्तिप्रदर्शन केलं.

मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत आज उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते.

अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील हे देखील अर्ज दाखल करत आहेत.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे.

कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण बारामती लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज सियाचिन दौऱ्यवर असून तिथं तैनात असलेल्या सैनिकांशी त्यांनी संवाद साधला. जगातील सर्वात उंचावरील युद्धभूमी सियाचिनमध्ये कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांमुळे देश आणि देशातील नागरिक सुरक्षित असल्याचं संरक्षणमंत्र्यांनी सांगितलं. सियाचिनसारख्या अत्यंत खडतर आणि प्रतिकूल परिस्थिती देशसेवा बजावणाऱ्या सैनिकांबद्दल प्रत्येक नागरिकाच्या मनात आदर असल्याचंही राजनाथ यांनी सांगितलं. १३ एप्रिलला ऑपरेशन मेघदूतला ४० वर्षे पूर्ण झाल्याचा आणि त्यात भारतीय सैनिकांच्या पराक्रमाचा गौरवपूर्ण उल्लेखही संरक्षणमंत्र्यांनी केला.  सैनिकांशी संवाद साधण्यापूर्वी राजनाथ यांनी शहिद स्मारकावर जाऊन आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज पद्म पुरस्काराचं वितरण होणार आहे. आज राष्ट्रपती भवनात होणाऱ्या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते माजी उपराष्ट्रपती एम.वेंकैय्या नायडू तसंच भरतनाट्यम नृत्यांगना डॉक्टर पद्मा सुब्रमण्यम यांना पद्मविभूषण पुरस्कार प्रदान करतील. डॉक्टर बिन्देश्वर पाठक यांना मरणोत्तर पद्म विभूषण प्रदान करण्यात येणार आहे. याचबरोबर अभिनेता मिथुन चक्रवर्ती आणि गायिका उषा उथ्थप यांना पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून डॉक्टर सीताराम जिंदाल,  हृदयरोग तज्ञ डॉक्टर तेजस  पटेल आणि राम नाईक यांना पद्म भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

<><><><><>

श्रीनगरमधल्या दहशतवादी कारवायांशी संबंधित प्रकरणात आज राष्ट्रीय तपास यंत्रणेनं नऊ ठिकाणी छापे मारले असून या ठिकाणी अद्याप तपास सुरु आहे.

<><><><><>

मालदीवमध्ये, काल झालेल्या संसदीय निवडणुकीत अध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांचा सत्ताधारी पीपल्स नॅशनल काँग्रेस अर्थात पीएनसी पक्ष, बहुमताच्या दिशेने वाटचाल करत आहे. मालदीव निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार मुइझ्झूंच्या पक्षानं ८६ जागांपैकी ६६ जागा जिंकल्या आहेत. या निवडणुकीत पूर्वी बहुमतात असलेल्या एम डी पी अर्थात मालदीवियन डेमोक्रॅटिक पार्टीचा दारूण पराभव झाला असून, त्यांना केवळ १२ जागा मिळाल्या आहेत. मुइझ्झू यांच्या चीनविषयक भूमिकेमुळे भारताच्या दृष्टीनं ही निवडमूक महत्त्वाची आहे.

<><><><><>

गाझा पट्टीतल्या राफाह शहरावर इस्राइलनं केलेल्या हल्ल्यात २२ जण ठार झाले आहेत. यात १८ बालकांचा समावेश आहे. पॅलेस्टाइनच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. गेल्या शनिवारी अमेरिकन सिनेटने गाझा पट्ट्यातल्या मदतकार्यासाठी ९ कोटी डॉलर्ससह इस्राइलला २६३ कोटी डॉलर्स चा निधी मंजूर केला आहे. त्यानंतर लगेचच इस्राइलनं हा हल्ला केला. सुमारे २३ लाख शरणार्थींनी आश्रय घेतलेल्या राफाह शहरावर इस्राइल जवळपास रोजच हवाई हल्ले करत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरुन हल्ले रोखण्याचं आवाहन होत असूनही इस्राइल या शहरात लष्करी अतिक्रमण करत आहे. इस्राइल हमास

संघर्षात आतापर्यंत ३४ हजारपेक्षा जास्त पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान इस्त्राइलनं पश्चिम किनाऱ्यावरची सर्वात मोठी लष्करी कारवाई संपुष्टात आणली.

<><><><><>

बुद्धीबळाच्या जागतिक स्पर्धेत १७ वर्षीय भारतीय बुद्धीबळपटू डी. गुकेश यानं ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कॅनडा टोरांटो इथं झालेली फिडे कँडीडेटस् स्पर्धा जिंकणारा तो सर्वात कमी वयाचा बुद्धीबळपटू ठरला आहे.

काल झालेल्या अंतिम फेरीत त्यानं ही ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. गुकेश आणि अमेरिकेचा हिकारू नाकामुरा याच्यातील अंतिम सामना अनिर्णित झाला. त्यामुळे या स्पर्धेत गुकेशनं १४ पैकी ९ गुण मिळवले. विश्वनाथन आनंद नंतर जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र ठरणारा तो दुसरा भारतीय बुद्धीबळपटू ठरला आहे.

दरम्यान, केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी समाज माध्यमावरून फिडे कँडीडेटस् स्पर्धेत डी गुकेश यानं मिळवलेल्या यशाबद्दल त्याचं अभिनंदन केलं आहे. गुकेश यानं १७ व्या वर्षी हे यश मिळवत ग्रँडमास्टर गॅरी कास्पोरोव यांचा विक्रम मोडल्याबद्दल ठाकूर यांनी कौतुक केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही गुकेश यानं मिळवलेल्या यशाबद्दल अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्सचा सामना मुंबई इंडियन्सशी होणार आहे. हा सामना जयपूरमधल्या सवाई मानसिंग स्डेडिअमवर

संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सनं पंजाब किंग्जचा ३ गडी राखून पराभव केला.

**//<><><><><>//**